# लहानपण देगा देवा

ती नुकतीच साऊथ आफ्रिकेच्या ट्रिप वरून परतली होती. अजून तिथल्या उबदार हवेची सूर्य किरणे मनात चमकत होती. मात्र न्यू इंग्लंड चा जरठ हिवाळा आता हाडा हाडात थंडी बोचवत होता. बाहेर सगळीकडे एक पांढरा धवल, हिमाचा महासागर पसरला होता. ज्याला फक्त भरतीच येत होती. न भूतो न भविष्याती असा हिम वर्षाव या ३ आठवड्यांत झाला, होईल-हे शेतकऱ्यांचे जुने अनुभवी निदान खरे ठरले तर!.

जेट लॅग घालवायला, रोजचा दिनक्रम आचरणात आणायलाच हवा. या हट्टानं सकाळच्या रामपारी नेहमीप्रमाणे तिने Holiday Inn- हेल्थक्लबच्या पूलाकडे गाडी हाकली. पार्किंग लॉट मध्ये जागा सापडायला वेळ लागला तेव्हाच तिला शंका आली. आज Valentine's दिन साजरा होणार होता त्याची निशाणी सगळीकडे लागली होती. हॉटेलमध्ये त्या निमित्त एक स्वप्नील Convention भरले होते. जवळ जवळ ३०० माणसे आली आहेत असा संदेश तिला आल्या आल्याच दारात स्वागतासाठी उभ्या असलेल्या टेडने दिला.

पूलावरची प्रचंड गर्दी पाहून तिच्या कपाळावर नकळत आठी उमटली. शाळेला सुट्टी होती हे तिच्या लक्षातच आलं नाही. आजूबाजूच्या गावांतली सगळ्या वयाची एकूण एक लहान मुल बहुतेक आज या पूलमध्ये गोळा झाली असावीत अस तिला वाटलं.

पूर्वी टी.व्ही. वर पाहिलेले  बनारस- प्रवास वर्णनाचे देखावे तिच्या मन:पटलावर दर्षित झाले. तिथल्या गलिच्छ गंगेत, अंधश्रध्देने दाटी वाटीने स्नान करणाऱ्या सर्व भाविकांची तिला एकीकडे चीड यायची नी दुसरीकडे त्यांच्या नितांत श्रध्देचा हेवाही वाटायचा!  तसंच आज त्या पूलाकडे जमलेलेल्या सगळ्या मुलाना पाहून झालं. त्यांच्या त्या उत्साहाचं खरं तर तिला एरवी कवतुकच वाटलं असतं. वास्तविक लहान मुलं, त्यांची निरागसता तिला फार आवडायची!  मॉँटसरी शिक्षिकेचा व्यवसाय तिने २३ वर्षं आवडीने जपला होता. तीच शिकायची  रोज त्यांच्याकडून ! आता तिला निवृत्त होऊनही बरीच वर्षं झाली.

परवा साऊथ आफ्रिकेत असंच एका रेझोर्ट मध्ये ती पोहत असताना काठावर एक लहान मुलगी तिच्याकडे निमिषमात्र नजरेने एक टक बघत होती, हे तिच्या लक्षात आलं. तिच्या चेहऱ्यावरच्या भावांवरून त्या मुलीलाही पाण्यात पोहावयास आवडलं असतं असं फार जाणवत होतं. तेव्हा लगेचच तिनं त्या मुलीला नजरेनेच खुणावलं, “तू पण ये नं पोहायला?"

मुलीने आपल्याकडे पोहण्याचा पोशाख नाही हे सांगितलं.
तिन हळूच सुचवलं, “अग तुझा टी शर्ट आहे ना? ये तशीच. तुला पण मजा येईल”.
जवळच झाडत असलेल्या मोलकर्णीची ती मुलगी असावी बहुतेक. तिने आईकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. आईने परवानगी दिल्यावर त्या मुलीने क्षणाचाही विचार न करता पाण्यात उडी घेतली. नंतर बराच वेळ त्या नवीन सापडलेल्या छोट्या मैत्रिणीबरोबर ती पाण्यात पोहत होती. स्वतःच केलेल्या लाटांवर दोघी नाचत राहिल्या आनंदाने! पण आज इथे मात्र त्या मुलांचा तिला रागच येऊ लागला. तिच्या नेहमीच्या वॉटर आरोबिक्स वर पाणीच पडलं!

ती दबकत दबकत पाण्याकडे चालत गेली. पुलाच्या बाहेर काठावरही सगळीकडे पाणी पाणी झाले होते. चालायला फार घसरडे होते. पोहण्याकरिता तिने पाण्यात पाय टाकला. तक्त्यावाराचे सगळे नियम उडवून मुलं पूल मध्ये किंचाळत, कोणाची तमा न बाळगता, वाट्टेल तशा उड्या पाण्यात मारत होती. डुम्बत होती. त्या कर्कश गोंगाटाची डोकेदुखी तिला भेडसावू लागली. त्या मुलांनी तिची नेहमीची नितांत शांतता हिसकावून घेतली. कुठे गेले त्यांचे पालक? एकटीचा तिचा पूल नेहमीचा, आज वाट्याला खास नव्हता. चूक केली. उगाच आले आज! विचारांचा भोवरा भुणभूणु लागल. मनातल्या मनात पोहतानाचा तिचा नेहमीचा उपक्रम.. जप करण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरु.

त्याबरोबर मग तिचा व्यायाम जोरदार सुरु झाला. ती पाण्यात खूप वेगाने पुढे अन मागे, हाता/पायांची क़वाईत करत मागे उलटी चालत येत असताना तिच्या कानांवर शब्द आले,
"तू असे पाणी उडवत पोहतेस हे मला अजिबात आवडत नाही. तेव्हा तू हे तत्काळ थांबव!" गोड आवाजात पण तितक्याच अधिकार वाणीचे शब्द.
कोण एवढ्या धिटाईन ही धमकावणी देताय? हे बघण्यासाठी ती थबकली, तिने वळून पाहिले. एक लहान पिटुकली तिला ठामपणे सांगत होती. अरे ही तर लियान. परवाच तिच्या आजीबरोबर पोहायला आली असताना तिची ओळख झाली होती. अवघी ३ वर्षांची पण ऐट ठमाबाईची! अन वरती लाडिक चुरूचूर बोलणं, वयाला न शोभणारं. तिचा तो ठसका त्यावेळीही तिला भुलवून गेला होता. ह्या झाशीच्या राणीचा तोरा वेगळाच आहे, तिला कोण नकार देणार? मनाविरुद्ध तिला एक लडिवाळ आश्वासन देऊन त्या सर्व गोंधळात कशीबशी ती परत पोहू लागली.

तिच्या फेऱ्या चालूच होत्या, एवढ्यात डोळयांच्या कोपऱ्यात एका मस्यगंधेची हिरवी निळी शेपटी डोकावली. परत तीच शेपटी? तिचा स्वतःवर विश्वास बसेना....सुरस कथेतील सोनेरी केसांची मस्यगंधा सुरकन सूर मारून वरती येत होती.

अजूनही जेट लॅग गेला नाही? काहीतरीच काय दिसतंय तुला? तिने मनाला जाब विचारला. पण मग

स्वतःशीच खुदकन हसू आलं. तिला समजून चुकलं. आजच्या या भूलभूलय्या दुनियेत काय काय बाजारात विकतील? तिला गंमत वाटली. किती सुंदर कल्पना? त्या एका ७/८ वर्षांच्या बालिकेला ती रबरी शेपटी सहजतेने कमरेतून घालून मस्यगंधा होण्याची स्वप्नीय संधी मिळाली.

येस व्हर्जिनिया देअर इज सँटा क्लॉज- Yes Virginia there is a Santa Claus! Déjà vu! मागे असाच, त्या पुलावरती नाताळच्या सणाला सँटा क्लॉज घंटा किणकिणवत अचानक प्रगट झाला होता. त्याला बघून तेंव्हाही ती अशीच परत लहान बनली होती. सँटा क्लॉज-खरंच वास्तवात आहे असा तिला विश्वास वाटला.  तिच्या दु:खी जीवनात आशेचा एक तेजस्वी किरण-तो सँटा फार आनंदप्रकाश देऊन गेला होता. ती आठवण त्या मस्यगंधेला पाहून आज परत नव्याने उचंबळली.

एव्हढ्यात तिला एक ठेंगू सरदार  काठावर तरातरा ठुमकत येताना दिसला. वय फार तर दोन अडीच वर्षांचं. अंगावर पूर्णपणे कपडे अन पायात मात्र गमबूट. आला नी पुलाच्या काठावर साठलेल्या पाण्याच्या तळ्यात--पडल मध्ये-- थयाथया नाचू लागला. उडी मारल्यावर अंगावर उडणाऱ्या तुषारांची त्याला फार मजा वाटली. नी मग तो आणखीनच आनंदाने बेहोष होऊन परत परत उड्या मारू लागला. परत त्याच्याहून ती अधिकच लहान झाली. अर्ध्या फेरीतच मध्येच थांबून त्याचा तो बालिश आनंद देहभान विसरून पाहू लागली. मगाशी त्या सगळ्या मुलांच्या धांगडधिंग्याने उमटलेल्या कपाळावरच्या आठ्या मावळल्या. मनाची नाराजी, राग पळाला.
“लहानपण देगा देवा”.... त्या चिमुकल्या ठेंगू सरदाराचा तिलाच उलटा नजराणा. आनंदाच्या शेल्यात बांधलेला.

अंगणातले पक्षी. त्यांच्यासारखीच तिची परिस्थिती. उद्या येणाऱ्या हिम वादळा आधीच, तिने आठवणीने बियादाणे बर्ड फीडर मध्ये भरून ठेवले होते. पण तो फीडर बर्फाच्या ढिगाऱ्याखाली झाडाच्या फांदीमध्ये लपला होता. त्याच्या खिडकीवर बर्फ साठला होता. पण ते वेडे पक्षी जवळचा बर्ड फीडर विसरून भर बर्फाच्या ढिगाऱ्यात दाणे शोधत राहिले. शेवटी थंडीच्या माऱ्याने हैराण झालेले पक्षी बिचारे उपाशीच!

सकाळच्या अंगणातले भुकेलेले ते सारे पक्षी, आता तिच्या अंतरंगाच्या पारावर पुन्हा बागडू लागले.

"तुझे आहे तुजपाशी परी जागा चुकलासी"! आत्मानंदाच्या लहरीत ती आता पूर्णपणे तरंगू लागली

**ज्योती जोशी,**
Norton, MA